एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)-११ अंतर्गत परिविक्षाधीन सहायक गट विकास अधिकारी, गट-ब यांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाकरिता जिल्हा वाटप करण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

**शासन आदेश क्रमांकः** RDD-14011/91/2025-RDD(Est-3A)

३ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
तारीख: २९ ऑगस्ट, २०२५

**वाचा :**

१) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः** टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २० जानेवारी, २०१४.
२) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः** टीआरएन-१११४/प्र.क्र.९६/१४/१८-ब, दिनांक २० एप्रिल, २०१५.
३) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः** टीआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दिनांक १ ऑगस्ट, २०२५.
४) **कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः** टिआरएन-०६२५/प्र.क्र.२६/प्रशि-३, दिनांक १४ ऑगस्ट, २०२५.

**प्रस्तावना :**

उपरोक्त वाचा मधील अनुक्रमांक १ येथील दिनांक २० जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे सरळसेवेने शासनसेवेत नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांसाठी २ वर्ष कालावधीचा एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) सुरू करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त वाचा मधील अनुक्रमांक ३ येथील दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा परिक्षेद्वारे शासन सेवेत गट-अ व गट-ब मध्ये नियुक्त होणाऱ्या परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाचा (सीपीटीपी) सुधारीत आराखडा निश्चित करण्यात आला असून सीपीटीपी-११ व तद्नंतरच्या पुढील तुकड्यांना लागू करण्यात आला आहे.

०२. सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त वाचा मधील अनुक्रमांक ४ येथील दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये, राज्य सेवा परीक्षा-२०२३ अन्वये सहायक गट विकास अधिकारी, गट-ब पदासाठी शिफारस प्राप्त ठरलेल्या एकुण ५० व राज्य सेवा परिक्षा-२०२२

अन्वये सहायक गट विकास अधिकारी, गट-ब पदासाठी शिफारस प्राप्त ठरलेल्या व मुदतवाढ घेतलेल्या ६ अशा एकुण ५६ उमेदवारांना परिविक्षाधीन सहायक गट विकास अधिकारी, गट-ब पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर कार्यालयीन आदेशामध्ये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)-११ अंतर्गत प्रशिक्षणार्थी अधिकारी यांना जिल्हा संलग्नता या टप्प्याच्या प्रशिक्षणासाठी दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी रूजू होण्याबाबत कळविण्यात आले आहे. सबब, एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-११ अंतर्गत एकुण ५६ परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी जिल्हा वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन आदेश :</u>

राज्य सेवा परीक्षा-२०२३ अन्वये सहायक गट विकास अधिकारी, गट-ब पदासाठी शिफारस प्राप्त ठरलेल्या एकुण ५० व राज्य सेवा परिक्षा-२०२२ अन्वये सहायक गट विकास अधिकारी, गट-ब पदासाठी शिफारस प्राप्त ठरलेल्या व मुदतवाढ घेतलेल्या ६ अशा एकुण ५६ परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना, सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त वाचा मधील अनुक्रमांक ३ येथील दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)-११ अंतर्गत खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी सोबत जोडलेल्या **<u>परिशिष्ट- अ</u>** नुसार, जिल्हा परिषद वाटप करण्यात येत आहे.

०२. परिविक्षाधीन सहायक गट विकास अधिकारी यांनी संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे **दिनांक १ सप्टेंबर, २०२५ (म.पू.)** रोजी रूजू व्हावे. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)-११ अंतर्गत खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी रूजू झालेल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा रूजू अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करणे आवश्यक आहे. यास्तव, संबंधित अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय यांनी त्यांच्या अखत्यारितील जिल्हा परिषदांमध्ये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)-११ अंतर्गत खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी रूजू झालेल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा एकत्रित रूजू अहवाल soest3a.rdd-mh@nic.in या ई-मेलवर शासनास दिनांक २ सप्टेंबर, २०२५ पर्यंत सादर करावा.

०३. सीपीटीपी-११ मधील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचे वेतन व इतर अनुषंगिक भत्ते प्राप्त व्हावेत यानुषंगाने संबंधित जिल्हा परिषदेने या अधिकाऱ्यांची सेवा पुस्तके तयार करणे, सेवार्थ प्रणालीमध्ये नोंदणी करणे, त्यांचे एनपीएस करीता खाते उघडणे तसेच अन्य अनुषंगिक बाबी पुर्ण करणे इत्यादी कार्यवाही प्रशिक्षणाच्या सुरूवातीच्या ४ आठवड्यांच्या कालवधीत करावी. परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाच्या पहिल्या महिन्यापासून संबंधित पदाचे नियमित वेतन प्रदान करावे.

**०४.** सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४ मधील मुद्दा क्रमांक ६ नुसार प्रशिक्षणार्थी अधिकारी यांच्या प्रशिक्षण कालावधीतील रजेबाबत निर्णय संबंधित जिल्हास्तरावरील अधिकारी यांनी घ्यावा.

**०५.** सदर प्रशिक्षणाबाबतची कार्यक्रम पुस्तिका स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. सदर कार्यक्रम पुस्तीकेनुसार प्रशिक्षण पूर्ण करण्यात यावे.

**०६.** संबंधित प्रशिक्षणार्थी अधिकारी यांनी खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणासाठी वाटप केलेल्या संबंधित जिल्हा परिषदेमध्ये **दिनांक १ सप्टेंबर, २०२५ (म.पू.)** रोजी रूजू व्हावे. संबंधित प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/२५६७/२८/ अकरा, दिनांक ३०.०८.१९८२ च्या शासन परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. संबंधित प्रशिक्षणार्थी अधिकारी यांनी वाटप केलेल्या जिल्हा परिषदेत बदल करण्यासाठी कुठल्याही स्वरूपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८२९११३०१८१९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR.URMILA VAIBHAV JOSHI

Digitally signed by DR.URMILA VAIBHAV JOSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=0a6ce46aedb9acea34c72711d852d8e2e71e76603f9082ea9709649c6f45dc30, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=713D6BDDB988B05B1CC072EBFD3A58E7E640EA20499573AAE08DC106AC632ADD, cn=DR.URMILA VAIBHAV JOSHI
Date: 2025.08.29 12:45:12 +05'30'

**(डॉ. उर्मिला जोशी)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
२. मा.मंत्री (ग्रा.वि.), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.), मंत्रालय, मुंबई.
४. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
६. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
७. संचालक, वनामती, धरमपेठ अमरावती रोड, नागपूर.
८. अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग.
९. सह सचिव/उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. उप सचिव (वित्त-१, आस्था-३ व वित्त-९), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. उप सचिव (आरक्षण-३ व प्रशिक्षण), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय, जिल्हा सर्व.
१४. संबधित परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी अधिकारी.
१५. निवड नस्ती (कार्यासन आस्था-३ अ), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई.

**शासन आदेश क्र. RDD-14011/91/2025-RDD(Est-3A), दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ सोबतचे सहपत्र**

**परिशिष्ट- अ**

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)- ११ अंतर्गत सहायक गट विकास अधिकारी, गट-ब संवर्गातील ५६ प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना "खातेनिहाय जिल्हा संलग्नता" या प्रशिक्षणासाठी जिल्हा परिषद वाटप

| अ. क्र. | परिविक्षाधीन अधिकाऱ्याचे नाव | स्व-जिल्हा | प्रशिक्षणासाठी देण्यात आलेली जिल्हा परिषद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.रविकांत चं. पाटील | सोलापूर | सांगली |
| २ | श्री.पृथ्वीराज सं. देशमुख | सोलापूर | लातूर |
| ३ | श्री.सौदागर वि. पवार | धाराशिव | सोलापूर |
| ४ | श्री.प्रशांत बा. इंगोले | धाराशिव | सातारा |
| ५ | श्री.ऋषिकेश बा. टेकाळे | अहिल्यानगर | धुळे |
| ६ | श्री.गणेश कि. केकाण | जालना | बीड |
| ७ | श्री.हरी द. पालवे | अहिल्यानगर | जळगाव |
| ८ | श्री.राकेश रा. पाटील | कोल्हापूर | रत्नागिरी |
| ९ | श्री.अनंत ता. घोरपडे | परभणी | हिंगोली |
| १० | श्री.प्रशांत र. गंगावणे | हिंगोली | परभणी |
| ११ | श्री.अनिकेत जि. शिंदे | सातारा | रत्नागिरी |
| १२ | श्री.ऋषिकेश रा. पाटील | सोलापूर | धाराशिव |
| १३ | श्री.मुलाणी सकलेन बहाउद्दीन | पुणे | रायगड |
| १४ | श्री.महेश शि. दहिफळे | पुणे | सातारा |
| १५ | श्री.वैभव ज. कोंघे | हिंगोली | यवतमाळ |
| १६ | श्री.प्रितेश ए. नानकर | धुळे | नाशिक |
| १७ | श्री.आनंद ज. मोरे | सोलापूर | लातूर |
| १८ | श्री.अक्षय ग. इंगळे | जळगाव | नंदूरबार |
| १९ | श्री.सुधीर ज्ञा. पाटील | लातूर | सोलापूर |
| २० | श्री.रवींद्र ब. बोरूडे | अहिल्यानगर | नाशिक |
| २१ | श्री.अमोल बा. पडवळ | अहिल्यानगर | छत्रपती संभाजीनगर |
| २२ | श्री.मनोज सु. ताठे | पुणे | रायगड |
| २३ | श्री.निलेश पां. चौगले | कोल्हापूर | रत्नागिरी |
| २४ | श्री.सुयश पो. व्हनमाने | सोलापूर | कोल्हापूर |
| २५ | श्री.आकाश गं. कोरडकर | अहिल्यानगर | नाशिक |
| २६ | श्री.योगेश सा. गवळी | बीड | लातूर |
| २७ | श्री.रवींद्र पं. परिहार | बुलढाणा | नागपूर |
| २८ | श्रीम.रूपाली भा. खाडे | सातारा | बीड |
| २९ | श्रीम.कावेरी कि. जाधव | परभणी | हिंगोली |

| अ. क्र. | परिविक्षाधीन अधिकाऱ्याचे नाव | स्व-जिल्हा | प्रशिक्षणासाठी देण्यात आलेली जिल्हा परिषद |
|---|---|---|---|
| ३० | श्री.मधुकर सु. बिलगे | छत्रपती संभाजीनगर | बीड |
| ३१ | श्रीम.प्रतिभा रा. पाटील | सोलापूर | धाराशिव |
| ३२ | श्रीम.मयुरी य. जांभुळकर | पुणे | कोल्हापूर |
| ३३ | श्रीम.तेजश्री ब. गायकवाड | कोल्हापूर | सिंधुदूर्ग |
| ३४ | श्रीम.प्रगती द. इंगवले | सातारा | कोल्हापूर |
| ३५ | श्रीम.वृषाली आ. जाधव | सोलापूर | धाराशिव |
| ३६ | श्रीम.वैभवी रा. ठाकरे | जळगाव | धुळे |
| ३७ | श्रीम.नेहा वि. चिकणे | पुणे | नाशिक |
| ३८ | श्रीम.शिरीष स. माने | सातारा | सांगली |
| ३९ | श्रीम.मोनाली भा. खेमनर | अहिल्यानगर | नाशिक |
| ४० | श्री.बुद्धिवान बिं. निखाडे | यवतमाळ | अकोला |
| ४१ | श्री.शंकेश्वर ह. अहिवळे | सातारा | सोलापूर |
| ४२ | श्री.धम्मदीप रा. फुल्लुके | गोंदिया | वर्धा |
| ४३ | श्री.अनिल मा. जाधव | पुणे | रायगड |
| ४४ | श्रीम.सुलभा र. गजभिये | पुणे | कोल्हापूर |
| ४५ | श्रीम.आरती मा. चव्हाण | नांदेड | जालना |
| ४६ | श्री.दीपक का. वार्डे | नाशिक | जळगाव |
| ४७ | श्रीम.अस्मिता म. गायकवाड | नांदेड | लातूर |
| ४८ | श्रीम.मोहिनी दे. पतंगे | हिंगोली | जालना |
| ४९ | श्री.पियुष अ. सोमकुवर | नागपूर | गोंदिया |
| ५० | श्रीम.वर्षा ज्ञा. कांबळे | पुणे | नाशिक |
| ५१ | श्री. हर्षवर्धन ज. माने | सातारा | कोल्हापूर |
| ५२ | श्री. गजानन अं. मोहिते | परभणी | नांदेड |
| ५३ | श्री. विजय रा. हिरे | जळगाव | नंदूरबार |
| ५४ | श्रीम. सुप्रिया शि. गावडे | सोलापूर | लातूर |
| ५५ | श्रीम. प्रीती शां. घोरपडे | पुणे | अहिल्यानगर |
| ५६ | श्री. उत्कर्ष द.मोराणकर | नाशिक | नंदूरबार |